# सायन्सकोर मैदान येथील रुक्मिणी गणेशोत्सव मंडळात 'आरोग्य शिबिर' आणि 'लोकसंवाद' कार्यक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अमरावती** – मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष आणि जिल्हा माहिती कार्यालयाने येथील रुख्मिणी नगरातील सायन्सकोर मैदानावरील रुख्मिणी गणेशोत्सव मंडळात सोमवार २१ सप्टेंबर रोजी 'आरोग्य शिबिर' आणि लोकसंवाद उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.



राज्य शासनाने गणेशोत्सवाला राज्य उत्सवाचा दर्जा दिला असून गणेशोत्सवा दरम्यान विविध गणेश मंडळांमध्ये मुख्यमंत्री सहायता निधी कक्षातर्फे 'श्री गणेशा आरोग्याचा' उपक्रम तसेच जिल्हा माहिती कार्यालयांच्यावतीने जनतेपर्यंत विविध शासकीय योजनांची माहिती पोचविण्यासाठी 'लोकसंवाद' उपक्रम राबविण्यात येत आहे.उभय कार्यालयांच्यावतीने आयोजित या उपक्रमात रुख्मिणी गणेशोत्सव मंडळामध्ये श्री गणरायाचे दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या नागरिकांच्या नि:शुल्क रक्तदाब ,मधुमेह (डायबेटिस),नेत्र आणि दंत तपासणी करण्यात आल्या. यासाठी शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा सामान्य रुग्णालय आणि डॉ.राजेंद्र गोळे आयुर्वेदिक महाविद्याल व रुग्णालयाच्या वैद्यकीय चमुने शिबिरास भेट देणाऱ्या नागरिकांच्या वैद्यकीय तपासण्या केल्या. मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष अमरावती जिल्हा प्रमुख श्याम गावंडे यांनी उपस्थित नागरिकांना श्री गणेशा आरोग्याचा उपक्रमांतर्गत जिल्हाभर राबविण्यात येत असलेल्या आरोग्य शिबिरांबद्दल तसेच आरोग्य तपासणीत आजाराचे लक्षणे आढल्यास मुख्यमंत्री सहायता निधी कक्षाशी संलग्नीत रुग्णालयामध्ये देण्यात येणाऱ्या नि:शुल्क उपचाराबाबत माहिती दिली. जिल्हा माहिती कार्यालयाचे माहिती अधिकारी रितेश भुयार यांनी मृद व जलसंधारण विभाग, कौशल्य,रोजगार व नाविन्यता विभाग तसेच कृषी विभागाच्या योजनांबाबत आणि 'लोकसंवाद' उपक्रमाबाबत उपस्थित नागरिकांना माहिती दिली.

मंगळवार, २२ सप्टेंबर रोजी सायंकाळी ७ वाजता कठोरा रोड स्थित पोदार शाळेशेजारील जय अंबा गणेशोत्सव मंडळात 'लोकसंवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. महिला व बालविकास विभाग आणि ग्रंथालय संचालनालयातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजना व उपक्रमांची माहिती या कार्यक्रमात देण्यात येणार असून या विभागांशी संबंधित नागरिकांच्या प्रश्नांचे उत्तरेही देण्यात येणार आहेत.



# टिमटाळा तलावावर संस्था नोंदणीसाठी मच्छिमारांनी अर्ज करण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – अमरावती तालुक्यातील ५०० हेक्टरखालील पाटबंधारे, जलसंधारण विभागाचा ४३ हेक्टर क्षेत्र असलेला टिमटाळा तलाव, ता. नांदगाव खंडेश्वर हा तलाव मत्स्यव्यवसाय विभागाकडे हस्तांतरित करण्यात आला आहे. या तलावावर संस्था नोंदणीसाठी मच्छिमारांनी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.




सदर तलावावर मत्स्यव्यवसाय संस्था नोंदणी करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. तलाव परिसरातील स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त नागरिक तसेच मच्छिमार महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

याकरिता इच्छुक असलेल्या परिसरातील स्थानिक मच्छिमार, प्रकल्पग्रस्त आणि महिलांनी सहाय्यक निबंधक (सहकारी संस्था), अमरावती यांच्या कार्यालयाशी तात्काळ संपर्क साधावा. तसेच जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत संस्था नोंदणीसाठी आवश्यक तो प्रस्ताव सहाय्यक निबंधक कार्यालयात सादर करावा, असे आवाहन सहाय्यक आयुक्त मत्स्यव्यवसाय यांनी केले आहे.

## वाठोडा एस.जी.देशमुख लिटिल स्टार कॉन्व्हेंटमध्ये

# पर्यावरण पूरक गणपती मूर्ती रचना कार्यशाळा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**चांदस वाठोडा** – एस.जी.देशमुख लिटिल स्टार कॉन्व्हेंट वाठोडा व सुमनबाई उपासे नेक्सस इंटरनॅशनल स्कूलच्या प्रांगणात पर्यावरण पूरक गणपती मूर्ती रचना कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली होती.

वाठोडा येथील परिचित मूर्तिकार किशोर लोखंडे यांनी विद्यार्थ्यांना गणपतीच्या मूर्तीची रचना कशी करायची? याचे पायाभूत प्रशिक्षण दिले व तसेच विद्यार्थ्यांना मुर्ती बनवताना मदतही केली स्वतः सुद्धा गणपती बाप्पाच्या मुर्ती बनवुन दाखविली. शाळेच्या शिक्षकांनीही सुद्धा विद्यार्थ्यांसोबत मातीच्या गणपतीच्या मुर्त्या घडवल्या प्रत्येक मूर्तीमध्ये एका वनस्पतीचे बी टाकण्यात आले. सर्व विद्यार्थ्यांनी त्यांनी लावलेल्या झाडांच्या मुळांजवळ स्वतः बनवलेल्या गणपतीच्या मूर्तीचे विसर्जन केले शाळेच्या मुख्याध्यापिका रोशनी कांबळे यांनी विद्यार्थ्यांना प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तीची स्थापना केल्यामुळे होणाऱ्या पर्यावरणाच्या हानीची जाणीव करुन दिली. प्लास्टर ऑफ पॅरिसची मूर्ती स्थापन न करण्यासाठी प्रवृत्त केल.




बाप्पाच्या भक्तांनी मूर्तीचे पूजन करुन बाप्पांच्या नावांचा जयघोष केला सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार वाटप करण्यात आला तसेच सर्व विद्यार्थ्यांनी गणपती बाप्पाच्या मूर्तीचे विसर्जन शाळेलगत असलेल्या यशवंतबाबा मंदिराच्या बाजुला बेल नदीत करण्यात आले. संपूर्ण निर्माल्य वाळवून त्याचे धूप बत्ती बनवण्यासाठी उपयोगात आणणार आहे. संपूर्ण विद्यार्थ्यांनी बाप्पाच्या मुर्तीला आनंदाने व मोठ्या हर्षोल्हासात विसर्जित केले.

# मृतदेहाचे ९ तुकडे अनब दोन जण बेपत्ता! शारजाहमधील भारतीय व्यक्तीच्या हत्येने खळबळ : पोलिसांकडून शोध सुरू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शारजाह** – कर्नाटकातील उडुपी जिल्ह्यातील एका व्यक्तीची संयुक्त अरब अमिरातीतील शारजाहमध्ये हत्या झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अल्विन प्रकाश कुंदर असे मृत व्यक्तीचे नाव आहे. जुलै महिन्यात त्यांची हत्या करण्यात आली होती. त्यानंतर त्यांच्या मृतदेहाचे ९ तुकडे करून दोन पिशव्यांमध्ये भरल्याचे समोर आले आहे. जवळपास दोन महिन्यांनंतर या घटनेचा तपशील समोर आला आहे.




प्रकाश कुंदर हे गेल्या १४ वर्षांपासून शारजाह विमानतळावर काम करत होते. ते पत्नी टीना कुंदर आणि दहावीत शिकणाऱ्या मुलासोबत शारजाहमध्ये राहत होते. प्रकाश यांची पत्नी टीना या शिक्षिका म्हणून काम करत होत्या. प्रकाश यांच्या मृत्यूनंतर त्यांची पत्नी आणि किशोरवयीन मुलगा दोघेही बेपत्ता असल्याची माहिती आहे.

प्रकाश यांचे भाऊ अनिल प्रशांत कुंदर यांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांनी २० जुलैच्या आसपास प्रकाश यांना फोन केला होता.

# युद्ध सुरू असतानाच इराणचे राष्ट्राध्यक्ष अमेरिकेत

## आज संयुक्त राष्ट्रांमध्ये भाषण देणार, पण न्यूयॉर्कमध्ये कुठेही प्रवास करण्यासाठी...

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**न्यूयॉर्क** – इराणचे राष्ट्राध्यक्ष मसूद पेजेश्कियान न्यूयॉर्कमध्ये दाखल झाले. ते आज २३ सप्टेंबर रोजी संयुक्त राष्ट्र महासभेत भाषण देणार आहेत. इराणसोबत युद्ध सुरू असलेल्या अमेरिकेने, मसूद पेजेश्कियान आणि परराष्ट्र मंत्री अब्बास अराघची यांना संयुक्त राष्ट्रांच्या बैठकीला उपस्थित राहण्यासाठी अमेरिकेत प्रवास करण्याची परवानगी दिली आहे. पेजेश्कियान आणि अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष ट्रम्प एकाच शहरात असतील, परंतु त्यांच्यातील भेट सध्या अनियोजित आहे. ट्रम्प यांनी मसूद पेजेश्कियान यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केली आहे, परंतु इराणी बाजूने म्हटले आहे की दोन्ही नेत्यांमध्ये कोणतीही भेट नियोजित नाही. इराणी नेत्यांच्या संयुक्त राष्ट्रांमधील भाषणांचा इतिहास अनेक मोठ्या वादांनी गाजला आहे. कधीकधी भाषणादरम्यान अमेरिकन प्रतिनिधी मंडळ सभागृहातून बाहेर पडले, कधीकधी एखादा आंदोलक व्यासपीठापर्यंत पोहोचला आणि कधीकधी अनेक देशांचे प्रतिनिधी एकाच वेळी बाहेर पडले. होर्मुझबाबत कोणता संदेश देतील? इराणने आधीच म्हटले आहे की, जर अमेरिकेने लष्करी दबाव आणि बंदरांवरील नाकेबंदी शिथिल केली, तर ते सात दिवसांच्या आत होर्मुझची सामुद्रधुनी खुली करू शकतात.

त्यामुळे, भाषणातील या विषयावरील कोणताही नवीन संकेत महत्त्वाचा ठरेल. ट्रम्प यांना कोणता संदेश देतील? दोन्ही नेत्यांची भेट नियोजित नाही.




**Change Name**
**Old Name**
SHASHIKANT KESHAORAO KALE
**New Name**
Shashikant Keshavrao Kale
Ward No.9, Mahatma fule Nagar, Bande Hospital Jawal, Warud Tq.Warud Dist.Amravati 444906

**जाहीर नोटीस**

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील आय.जे.ठाकरे साहेब, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४९१/२०२६ ने.ता.११/०९/२०२६**

**अर्जदार :-**

श्रीमती प्रमिला विश्वनाथ ठाकरे
वय अं.६९ वर्ष, धंदा-घरकाम
रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत गणेश विश्वनाथ ठाकरे, रा.टेंभुरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **११/०८/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

**न्यायालयाचा शिक्का**

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# उद्धव ठाकरे-एकनाथ शिंदेंना कल्याण कोर्टाचा दिलासा : दिवंगत नेते वसंत डावखरे प्रकरणाचा १७ वर्षांनी निकाल, चौघांची निर्दोष मुक्तता

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – राज्याच्या राजकीय वतुर्ळाचं लक्ष लागून राहिलेल्या दिवंगत नेते वसंत डावखरे मानहानी खटल्याप्रकरणी मोठी बातमी समोर आली आहे. गेल्या १७ वर्षांपासून सुरू असलेल्या दिवंगत नेते वसंत डावखरे मानहानी खटल्याचा आज अंतिम निकाल आला आहे. या प्रकरणी चारही जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. कल्याण कोर्टत या संदर्भात सुनावणी पार पडली असून २००९ च्या कथित उऊ



प्रकरणापासून सुरू असलेल्या या खटल्यात राज्याचे माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना ठाकरे गटाचे सर्वेसर्वा उद्धव ठाकरे, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह एकूण ४ संशयित आरोपी होते. मात्र अखेर या खटल्याचा आज अखेर निकाल लागला असून कल्याण कोर्टानं चारही जणांची निर्दोष मुक्तता केल्याची माहिती आहे. कल्याण कोर्टाचे न्यायाधीश संतोष आगे यांनी या संदर्भात निकाल दिला आहे.

दिवंगत नेते वसंत डावखरे यांनी दाखल केलेल्या खटल्यात २० पेक्षा अधिक साक्षीदारांची साक्ष नोंदवली गेली होती. यात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांचे तउद्वारे जबाब नोंदवण्यात आला. सर्व आरोप खोटे असल्याचे युक्तिवाद यावेळी करण्यात आला. न्यायालयाने सर्व आरोपींची कलम ३१३ अंतर्गत जवाब नोंदवत प्रक्रिया पूर्ण केली आहे. अशातच आज या प्रकरणात निकाल लागला असून उद्धव ठाकरे यांच्यासह राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अन्य दोघांना मोठा दिलासा मिळाला आहे.